महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : १५८ वा दिनांक : २१/०३/२०२५ वार : शुक्रवार

## बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी राष्ट्रगीत थांबवले



**पटना** : बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी गुरुवारी पाटणा येथील एका कार्यक्रमात राष्ट्रगीत सुरू होण्यापूर्वीच थांबवले. ते स्टेजवरून हातवारे करून म्हणाले, 'आधी आपण स्टेडियमभोवती एक फेरी मारूया, मग तुम्ही सुरुवात करू शकता.' मुख्यमंत्र्यांनी संकेत देताच मंत्री विजय चौधरी यांनी राष्ट्रगीत थांबवले.

खरंतर, मुख्यमंत्री सेपक तक्रो विश्वचषक २०२५ च्या उद्घाटनासाठी पाटलीपुत्र क्रीडा संकुलात आले होते. राष्ट्रगीत थांबवल्यानंतर, ते स्टेडियमला एक फेरी मारण्यासाठी बाहेर पडले. मग काही वेळाने ते स्टेजवर परतले.

राष्ट्रगीत पुन्हा सुरू झाले. यादरम्यान, नितीश हात हलवून लोकांना अभिवादन करत राहिले. जेव्हा प्रधान सचिव दीपक कुमार यांनी हे पाहिले, तेव्हा त्यांनी हात हलवून त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला. त्यांना सावधान स्थितीत उभे राहण्याचा इशारा करण्यात आला, पण तरीही त्यांनी ऐकले नाही आणि पत्रकारांकडे पाहत त्यांना अभिवादन करू लागले.

शनिवारी पटना येथे होळी मिलन सोहळ्यादरम्यान मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी भाजप खासदार रविशंकर प्रसाद यांच्या पायांना स्पर्श केला. मात्र, भाजप खासदाराने मुख्यमंत्र्यांना थांबवले. जवळच उभे असलेले जेडीयूचे कार्यकारी अध्यक्ष संजय झा यांनीही मुख्यमंत्र्यांचा हात धरला. यानंतर नितीश कुमार यांनी रविशंकर यांना मिठी मारली. नितीश कुमार हे रविशंकर प्रसाद यांच्यापेक्षा ४ वर्षांनी मोठे आहेत.याआधी मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी दोनदा पंतप्रधान नरेंद्र मोदींचे पाय स्पर्श करण्याचा प्रयत्न केला होता. ७ जून २०२४ रोजी नितीश कुमार यांनी पहिल्यांदाच दिल्लीत पंतप्रधान मोदींचे पाय स्पर्श केले. निमित्त होते लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर दिल्लीत झालेल्या एनडीएच्या बैठकीचे.दुसऱ्यांदा १३ नोव्हेंबर २०२४ रोजी, जेव्हा पंतप्रधान दरभंगा एम्सच्या पायाभरणी समारंभाला आले होते. यावेळी, भाषण संपवून, मुख्यमंत्री त्यांच्या खुर्चीकडे जात होते. तेव्हा ते मध्येच थांबले आणि पंतप्रधान मोदींचे पाय स्पर्श केले.पाटणा येथे बापूंसाठी श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. येथे महात्मा गांधींना श्रद्धांजली वाहिल्यानंतर मुख्यमंत्री नितीश यांनी टाळ्या वाजवण्यास सुरुवात केली. विधानसभा अध्यक्ष नंदकिशोर यादव यांनी त्यांना थांबवले. यावेळी उपमुख्यमंत्री विजय सिन्हा गोंधळलेले दिसले. त्यांनी टाळ्या वाजवण्यासाठी हात वर केला. नंतर त्यांनी हात खाली घेतले.

## नागपुरातील हिंसाचाराचे वेगळेच कारण समोर



**नागपूर** : शहरात गेल्या तीन दिवसांपासून निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीबाबत महत्त्वाचा खुलासा समोर आला आहे. राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी सांगितले की, नागपुरातील दंगल ही औरंगजेबाच्या कबरीच्या प्रतिकृती जाळण्याच्या घटनेशी संबंधित नाही.

पोलिस आयुक्तांसोबत झालेल्या बैठकीनंतर प्यारे खान यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यांनी स्पष्ट केले की, या घटनेमागील खरे कारण पोलिस तपासातून समोर येईल. भाजप नेत्यांनी हा हिंसाचार पूर्वनियोजित असल्याचा आरोप केला आहे. मात्र पोलिस आयुक्तांचे वक्तव्य या आरोपांच्या विरोधात आहे.

सध्या शहरात अनेक भागांत कर्फ्यू लागू करण्यात आला आहे. या घटनेमुळे हिंदू-मुस्लिम समाजात तणाव निर्माण झाला आहे. काही परदेशी संपर्कातून चिथावणी दिली गेल्याची शंकाही व्यक्त होत असून सायबर पोलिस याचा तपास करत आहेत.

प्यारे खान यांनी हिंसाचारातील निर्दोषांना सोडण्याच्या आणि दोषींवर कडक कारवाई करण्याच्या सूचना पोलिसांना दिल्या आहेत. त्यांनी नागरिकांना शांतता राखण्याचे आणि प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. पडद्यामागील सूत्रधारांवरही कारवाई होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष म्हणाले की, पोलिसांवर आरोप करणे योग्य नाही. पोलिस सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे दगडफेक आणि मारहाण करणाऱ्यांचा शोध घेत आहेत. मुस्लिम समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी अल्पसंख्यांक आयोग प्रयत्नशील राहील असेही त्यांनी सांगितले.

## भाजप नेते नगरविकास खात्याची प्रकरणे काढत असतानाच नागपूरमध्ये दंगल कशी ? उद्धव ठाकरेंचा प्रश्न



**मुंबई** : अर्थसंकल्पीय अधिवेशनात भारतीय जनता पक्षाचे आमदार नगर विकास खात्यात आणि ठाण्यात सुरू असलेल्या भ्रष्टाचाराची प्रकरणे बाहेर काढत आहे. त्याचवेळी नागपूरमध्ये दंगल घडली, हा निव्वळ योगायोग आहे का? असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला. बऱ्याच वर्षांनंतर नागपूर मध्ये जातीय दंगल झाली आहे. ही नेमकी कोणी घडवली? हा संशोधनाचा विषय असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.

हे सरकार अपयश लपवण्यासाठी एक- एक गोष्टी करायला बघत आहे. मात्र, त्यात ते अधिकाधिक अपयशी होत असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला. या सरकारच्या कारभाराचे धिंडवडे दिवसागणिक सर्वांसमोर येत आहेत. त्यामुळे वेळ मारुन नेण्यासाठी हा सर्व कारभार चालू असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. केवळ दिशाभूल करण्याचा प्रयत्न सरकारकडून सुरू आहे. थडगे उखडायचे किंवा आणखी काही काढायचे, या सर्व गोष्टी थांबून जनतेने तुम्हाला जर खरेच बहुमत दिले असेल, तर ते बहुमत सत्कारणी लावा, असा सल्ला देखील त्यांनी दिला. तुमच्या या बहु-मताबद्दल जनतेच्या मनात संशय आहे. तरी देखील तुम्हाला संधी मिळाली असेल तर त्याचे सोने करा, त्याचा चिखल करू नका, असे देखील ते म्हणाले.

दरवेळी अधिवेशन आले तेव्हा दिशा सालियन प्रकरण काढले जाते. त्यात नवीन काय? गेल्या एक-दोन अधिवेशनात हा मुद्दा आला कसा नाही? असा असा मला प्रश्न पडला होता. असे देखील उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. एकिकडे शेतकऱ्यांची चिता जळत आहेत, त्याचे काय? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला. संतोष देशमुख यांची हत्या झाली, त्यांच्या हत्येचा काय? असे प्रश्न देखील ठाकरे यांनी उपस्थित केले आहेत. दिशा सालियन आणि ठाकरे कुटुंबाचा काहीही संबंध नसल्याचा दावा देखील उद्धव ठाकरे यांनी केला.

संजय गायकवाड यांनी आदित्य ठाकरे यांची पाठराखण केली आहे. त्यांना धन्यवाद देत असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. आमच्या गेल्या पाच पिढ्यांपासून घराणे जनतेसमोर आहे. या प्रकरणाशी आदित्य ठाकरे यांचा दुरान्वये देखील संबध नाही. तुम्ही खोट्याचा नायटा करणार असाल, तर त्याचा बूमरँग तुमच्यावर होऊ शकतो, असे देखील उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. या प्रकरणाचा आमच्या घराण्याशी काहीही संबंध नसल्याचेही ते म्हणाले.

शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या बाबतीत तुमचे काय मत आहे? असा प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एका कार्यक्रमात विचारण्यात आला होता. त्यावर त्यांनी 'काहीही भरोसा नाही' असे एका वाक्यात उत्तर दिले होते. त्याला प्रत्युत्तर देताना उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांना प्रतिप्रश्न केला आहे. 'सोनू तुझा माझ्यावर भरवसा नाय काय? या गाण्याची आठवण त्यांनी देवेंद्र फडणवीस यांना करुण दिली आहे. तसेच कोणत्याही नेत्याने भडकाऊ भाषण करू नये, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले असतील, तर मी त्यांना धन्यवाद देत असल्याचेही उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २१ मार्च २०२५


## दुसरबीड येथे ग्रामस्थ दिनाचा कार्यक्रम संपन्न




**सिंदखेडराजा (महेश मुंढे) :** राजस्व मंडळ दुसरबीड अंतर्गत जऊळका, ताडशिवनी, पिंपळगाव कुडा, दुसरबीड येथील शेतकरी यांना आज दि.१९/०३/२०२५ रोजी ग्रामपंचायत कार्यालय, दुसरबीड येथे मा. उपविभागीय अधिकारी प्रासंजय खडसे साहेब यांच्या संकल्पनेतून व मा. तहसीलदार साहेब सिंदखेडराजा यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थ दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सरपंच,ग्रा,पं सदस्य, अंगणवाडी सेविका,आशा सेविका,व गावकरी मंडळी उपस्थित होती.सदर कार्यक्रमाचे निमित्ताने गावातील लोकांना महसूल विषयक, कृषी विषयक, ग्रामपंचायत विषयक ॲग्री स्टॅक, संजय गांधी योजना, जिवंत सातबारा ,व इतर विषयी माहिती देण्यात आली, उपस्थितांच्या समस्या जाणून घेऊन निवारण व मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित शेतकरी बांधवांना वसुदेव जायभाये ग्राम महसूल अधिकारी दुसरबीड,श्री.गजानन मनसुटे मंडळ अधिकारी दुसरबीड यांनी मार्गदर्शन करून तक्रारीचे निवारण करून मार्गदर्शन केले.






## अंधानेर प्रशालेत जागतिक चिमणी दिवस साजरा




**कन्नड (अरुण थोरात):** तालुक्यातील अंधानेर प्रशालेमध्ये दि. २० मार्च रोजी जागतिक चिमणी दिवस साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक राजीव जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. २०१० पासून जागतिक चिमणी दिवस साजरा करण्यात येतो. यावेळी त्यांनी चिमण्या आणि प्रजातीबद्दल सखोल मार्गदर्शन केले. उन्हाळ्यात चिमण्याना प्रामूख्याने पाण्याचे तसेच अन्नाचे दुर्भीक्ष असते त्यासाठी प्रत्येकाने शक्य होईल तसे दाना व पाण्याची व्यवस्था करावी असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. प्रशालेचे कला शिक्षक दिपक सोनवणे यांनी सुंदर व सुबक असे चिमणीचे खडूच्या साहाय्याने फळ्यावर रेखाटण केले. ते सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.

यावेळी संजय केवट, आर. सि.पाटील, नारायण दांगट, मच्छिन्द्र डिघोळे, शामकांत येवले, रामभाऊ गुढेकर, सतीश कापुरे, मीनाक्षी बडग, योगेश जाधव, आरती बागुल, जावेद शेख, सीमा बोडखे, शेख अष्पाक यांसह विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचलन दिपक सोनवणे यांनी केले.

## छावा संघटनेच्या निवेदनाची तसीलदार यांनी घेतली दखल



**सिंदखेडराजा (महेश मुंढे) :** तहसीलदार यांना अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने संजय गांधी निराधार, श्रावण बाळ या योजनांच्या पात्र लाभार्थ्यांनसाठी महाडीबीटी कॅम्प राबवन्याबावत अशोक राजे जाधव यांच्या नेतृत्वात नागरिकांच्या विविध अडीअडचणीच्या बाबतीत निवेदन देण्यात आले, निवेदनात नमूद मागण्यांची पूर्तता दोन दिवसात करणार असल्याचे,अ भा छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष आणि त्यांचे सहकारी यांच्या समक्ष तहसीलदार अजित दिवटे यांनीआश्वासन दिले.सविस्तर वृत्त असे की,सिंदखेड राजा तहसील कार्यालयात निराधार योजनेतील लाभार्थ्यांची हेळसांड होत असल्याच्या बाबत अखिल भारतीय छावा संघटनेच्या निदर्शनास आल्यामुळे पुढील उपाययोजना करण्याबाबत,वयोवृद्ध नागरिक यांचा वेळ आणि आर्थिक भुर्दंड होत असल्याने,संजय गांधी निराधार, श्रावण बाळ या प्रकारच्या योजनांच्या पात्र लाभार्थ्यांना सोयीचे होईल म्हणून सिंदखेड राजा तालुक्यात गावोगावी महाडीबीटी कॅम्प घेण्याबाबत, सदर योजनेतील लाभार्थ्यांना तहसील कार्यालयात संबंधित कर्मचाऱ्याकडून सन्मानाची वागणूक मिळत नसल्या बाबत आणि तहसील कार्यालयात कामकाजासाठी ५० ते ६० किमी अंतरामुळे वयोवृद्ध नागरिक त्रस्त असतात त्यांना आर्थिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे, हा जो त्रास लाभार्थ्यांना याठिकाणी होत आहे याकडे प्रशासनाने गांभीर्याने दखल घ्यावी,जेणेकरुन संजयगांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजनेतील अपंग व वयोवृद्ध लाभार्थी अशिक्षित, वयोवृद्ध आणि अपंग असल्याने त्यांना अर्ज भरण्यासाठी मानसिक व शारीरिक त्रास या अभियानामुळे सहन करावा लागणार नाही, त्याचप्रमाणे अर्ज भरण्यासाठी, आधार मोबाईल क्रमांक लिंक पडताळणीसाठी तहसील कार्यालयात गर्दी होते ती होणार नाही, यामुळे नागरिकांची हेळसांड होत आहे त्यामुळे लाभार्थ्यांना सोईचे होईल यासाठी गावोगावी महाडीबीटी (अभियान) कॅम्प घेण्यात यावे.

याचबरोबर या दोन्ही योजनेत होणारा भ्रष्टाचार रोखण्यासाठी वेळोवेळी पात्र लाभार्थ्यांची यादी तहसील कार्यालय तसेच ग्रामपंचायत कार्यालयात लावण्यात यावी. वरील नमूद मागण्यांची पूर्तता तात्काळ करावी त्याचप्रमाणे नागरिकांची हेळसांड करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सक्त ताकीद देण्यात यावी. वरील सर्व गंभीर बाबींवर अखिल भारतीय छावा संघटना बुलढाणा जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांना घेऊन अशोक राजे जाधव यांनी तहसीलदार यांच्या सोबत सविस्तर चर्चा केली,चर्चे दरम्यान अशोक राजे जाधव यांना नागरिकांच्या होत असलेल्या गैरसोयीबद्दल तातडीने दोन दिवसात अभियान राबवणार असल्याचे आश्वासन दिले त्या प्रसंगी उपस्थित कृष्णा कोल्हे जिल्हा कार्याध्यक्ष अखिल भारतीय छावा संघटना बुलढाणा,बाळासाहेब शेळके विधानसभा अध्यक्ष अखिल भारतीय छावा संघटना मातृतीर्थ सिंदखेड राजा,रफीक सैय्यद प्रसिद्धीप्रमुख अखिल भारतीय छावा संघटना बुलढाणा,नारायण मस्के सोशल मीडिया प्रमुख अखिल भारतीय छावा संघटना देऊळगाव राजा, माजी नगरसेवक नरहरी तायडे, निलेश देशमुख, अर्जुन एखंडे, गजानन राजे जाधव यांच्यासह आदी पदाधिकारी निवेदन देताना उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २१ मार्च २०२५


## पाण्याचा वापर काटकसरीने करा - विनोद सातपुते



**सिंदखेडराजा (महेश मुंढे)** लोणार तालुक्यातील किनगाव जट्टू येथे, जल जागृती अभियानाचा भाग म्हणून, जिल्हा परिषद मराठी प्राथमिक मुलींची शाळा, येथे जल जागृती कार्यक्रम घेण्यात आला, यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक अनिल पवार होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून, जलसंपदा विभागातील अधिकारी परमेश्वर मुर्तडकर होते, यावेळी ग्रामपंचायत अधिकारी विनोद सातपुते यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना, पाण्याचे महत्व समजावून सांगितले, तसेच पाणी हे जीवन असून पाण्याचा वापर काटकसरीने करावा करावा सोबतच आपल्या कुटुंबातील व्यक्तींना सुद्धा पाण्याचा वापर काट केसरीने करावयाचा सांगणे, याबाबत सविस्तर माहिती दिली, तसेच प्रत्येकाने आपल्या घरासमोर आपल्या परिसरात आपल्या अंगणात सुद्धा एक झाड लावावे, म्हणजे पर्यावरणाचे संतुलन राखले जाईल, अशी भावनिक आव्हान त्यांनी यावेळी केले, तदनंतर उपस्थित विद्यार्थ्यांना जल प्रतिज्ञा घेतली, यावेळी कार्यक्रमाला शिक्षिका, कु, सरला दिगेकर, कु, वैशाली डोंगरे, यांच्यासह सर्व विद्यार्थी हजर होते

## नाथषष्ठी सुट्टीबाबत मुख्याध्यापक संभ्रमात

**खुलताबाद (प्रा. योगेश रावते) :** मागील अनेक वर्षांपासून नाथषष्ठीला जिल्हाधिकाऱ्यांकडून अधिकृत सुटी घोषित केली जात होती. परंतू यावर्षी शिक्षण विभागाने हा निर्णय मुख्याध्यापकांच्या अधिकारात दिला आहे. परंतु, अनेक मुख्याध्यापकांनी त्यांच्या अधिकारातील दोन सुट्या याआधीच मंजूर केल्या असल्याने शिक्षक आणि मुख्याध्यापक यांच्यासमोर मोठा पेच निर्माण झाला आहे की, सुटी कोणत्या अधिकाराखाली जाहीर करावी?पैठण येथे नाथषष्ठी ते कालाष्टमी या कालावधीत मोठा उत्साह असतो या पार्श्वभूमीवर दि.२२ मार्चलाजिल्हा परिषद व खासगी शाळांना शाळा व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने मुख्याध्यापक अधिकारातील सुट्टी देण्याचे निर्देश शिक्षण विभागाने दिले आहेत. मात्र मुख्याध्यापकांनी त्यांच्या अधिकारातील दोन सुट्या अगोदरच दिलेल्या असल्यामुळे नाथषष्ठीला सुटी काशी द्यावी, असा प्रश्न मुख्याध्यापकांना पडला आहे.शिक्षक संघटनांचे म्हणणे आहे की, यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांकडून अधिकृत सुटी जाहीर केल्यामुळे गोंधळ होत नव्हता परंतू या वर्षी शिक्षण विभागाने ही जबाबदारी मुख्याध्यापकांवर टाकल्यामुळे त्यांच्या समोर प्रश्न उभा राहिला आहे. नाथषष्ठीला सुटी देण्याचा निर्णय आधीच शिक्षण विभागाने घेतला असता, तर मुख्याध्यापकांना सुट्टीसाठी शाळा व्यवस्थापन समितीच्या मान्यतेची आवश्यकता भासली नसती. शिक्षण विभागाने याबाबत त्वरित निर्णय घ्यावा आणि वार्षिक सुटीच्या यादीत नाथषष्ठीला अधिकृत सुटी घोषित करावी अशी मागणी होत आहे. आता शिक्षण विभाग आणि जिल्हाधिकारी कार्यालय यावर काय निर्णय घेणार याकडे लक्ष लागले आहे.

## कडक उन्हात प्राणी पशु पक्षी च्या अन्न- दाना-पानी साठी चाललेली व्रतस्थ व्यक्तिमत्वाची धडपड



**पडेगाव (शिवाजी गायकवाड) :** येथिल मिटमिटा -जटवाडा भागात सूर्य तळपु लागला असून रज्यात उन्हाच्या झळाया वाढतच चालल्या आहे.दिवसेंदिवस तापमाण वाढत आहे. जंगलातील नैसर्गिक पाणसाठे अटत चालले आहे. परिणामी जंगलातील मुके पशु -प्राणी पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करताना दिसत आहे.अशातच मिटमिटा -जटवाडा डोंगरातील जंगली मुके पशु प्राणी यांनाही कडक उन्हात पाणी मिळवण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. यात सुसर, हरीण, मुंगुस, सरपटणारे साप, घुबड, घार, घुले, साळुंकी,उदबिल्ले, रानमांजर, रान बोक्या, ससे, सायाळ, कालवीट, मोर इत्यादी पशु पक्षी पाण्याच्या शोधत मानवाकडे आर्त हाक करताना दिसत आहे परंतु स्वतः च्या उपभोगत अडकलेल्या मानव प्राण्याला कुठे वेळ मिळतो. म्हणून मिटमिटा येथिल प्राणी पशु पक्षी मित्र असलेले आणि जंगलाबाबत आस्था असणारे भारत आसाराम दराडे हे आपल्या नित्य दैनिनंदिन कार्यभारातून वेळ काढत त्यांच्या अन्न दाना पाणीची व्यवस्था करत आहे. निःस्वार्थ, निरपेक्षपणे ते हा यज्ञ मागील दहा वर्षांपासून करत आहे. मॉर्निग वॉकला डोंगरात गेले असता त्यांना बरेच पक्षी - प्राणी मेलेल्या अवस्थेत दिसून आले शोध घेतला असता पाणी न मिळाल्याने त्यांचा मृत्यू झालेला होता असे लक्ष्यात आले तेव्हा पासून व्यथा होऊन ते दरवर्षी उन्हाळयात स्वखर्चातून आपल्या कमाईतला काही भाग काढतात व त्यातून ते मुक्या प्राण्या पशु पक्षी साठी पाणी हौद, टँकर द्वारे जंगलात पाणी उपलब्ध करून देत आहे त्यामुळे असंख्य पशु पक्षी प्राणी यांची पाण्यासाठी होणारी भटकंती काही आऊंशी थांबलेली दिसून येते परंतु अजून ही असे मदतीचे हात पुढे यायला हवे असं ते सांगतात. त्यांना विचारले असता की आपण का हे काम करतात तर त्यांनी उत्तर दिले की मानव तरी अन्न पाणी मागवू शकतो परंतु मुके प्राणी देवा शिवाय कोणाकडे मागणार ना? त्यांच्या साठीच खरे देव पाऊस पाडतो मानव त्यात भागीदार होतो. म्हणून मानवतेच्या दृष्टीकोनातून मी हे व्रत म्हणून कार्य करतो यात मला देवाला पाहण्याची अनुभावण्याची संधी मिळते.आणि माझ्या कुटुंबाला यात आनंद मिळतो. मला कशाचीही कमी पडत नाही माझं हसत खेळत हे कार्य चालू आहे. यातून मला काही मिळावं यासाठी माझी कशीही अपेक्षा नाही. अजून या कार्यबाबत मानवामध्ये जाणीव जागृती व्हावी व असं कार्य करत जावे असे वाटते.अशा निःस्वार्थ पणे कार्य करणाऱ्या पशु प्राणी प्रेमीची संख्या वाढत जावी यातून मिळणारा आनंद विकत घेता येत नाही. दराडे यांनी जंगलात भरून ठेवलेलया हौदावर असंख्य प्राणी पशु पाणी पिताना दिसतात.यांनी आपल्या घराला प्राणी पशु शाळा बनविलेले आहे. घराच्या गच्चीवर, झाडावर चिमण्या घर करून राहत आहे. दररोज सकाळ सायंकाळी चिमण्यांचा चिवचिवाट ऐकाला मिळतो. त्यामुळे जीव रमतो आणि थकवा निघून जातो.लोक धन्यवाद देतात त्यामुळे अजून कार्य करण्याची प्रेरणा मिळते. या उपक्रमाची मिटमिटा व परिसरात लोक मोठी चर्चा करताना दिसून येतात.दराडे यांनी जंगलात पाणी थंड राहावे म्हणून विशेष प्रकारचे साडे पाच बाय तीन आकाराचे सिमेंट ची हौद व कुंड्या तयार करून घेतले व त्याद्वारे ते जंगलात पशु पक्ष्याच्यासाठी पाण्याची व्यवस्था करत आहे हा नित्यक्रम ते कधीही चुकू देत नाही.दराडे यांना दोन मुले एक मुलगी असून पती पत्नी व मुलांना सोबत घेऊन ते हे कार्य करत आहे. तीन महिन्याला दीड क्विंटल धान्य, तीन टँकर पाणी लागत असते. प्रत्येक महिन्याला स्वतःच्या कमाईतून महिण्याकाठी दोन हजार रुपये ते मागे टाकतात त्यातून या कार्यवार खर्च करण्यास ते मागे पुढे पाहत नाही. त्यांच्या या निरपेक्ष कार्याची प्रेरणा इतरांनी घेऊन कार्य केलं तर जंगलातील पशु प्राणी पक्षी यांचे पाण्याअभावी होणारे मृत्यचे प्रमाण व तडफड थांबेल आणि मानवीय नैसर्गिक अधिवासातील प्राणी पशु पक्षी यांचे संवर्धन होऊन नैसर्गिक साखळी अबाधित राहण्यास मदत होईल.